**<u>महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ११६ अन्वये संक्षिप्त संपरिक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख अकोले येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात</u>**

**<u>संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र.२८६/२०२४</u>**

**<u>निशाणी क्र.</u>** १०

| | |
|---|---|
| **१– गुन्हा घडल्याची तारीख** | २४.०४.२०२४ |
| **२– फिर्याद दाखल केल्याची तारीख** | २४.०४.२०२४ |
| **३– फिर्यादी यांचे नाव वय पत्ता इत्यादीचा तपशील** | महाराष्ट्र शासन मार्फत, एस.जी.गुंजाळ, जवान, दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, संगमनेर–२, ता.संगमनेर, जि.अहमदनगर. |
| **४– आरोपीचे नाव वय पत्ता इत्यादीचा तपशील** | **सोनाली दत्तात्रय खरात,** वय ३१ वर्षे, रा.कोतुळ, ता.अकोले, जि.अहमदनगर. |

**५– दोषारोपपत्रातील गुन्हयाचा तपशील जो आरोपीस वाचून स्पष्ट करुन सांगण्यात आला तो या प्रमाणे–**

दिनांक २४.०४.२०२४ रोजी १३.०० वाजताचे सुमारास कोतुळ, ता.अकोले, जि.अहमदनगर येथील बस स्टॉपसमोरील पत्र्याचे टपरीमध्ये तुम्ही तुमच्या ताब्यात विनापरवाना व बेकायदेशीररित्या देशी दारु बॉबी संत्रा कंपनीच्या १८० मिली मापाच्या एकूण ३८ सिलबंद बाटल्या असा मुद्देमाल जवळ बाळगून त्याची चोरुन विक्री करण्याच्या उद्देशाने थांबले असताना मिळून आलात व त्याद्वारे तुम्ही महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केल्याचे तोहमत आहे व सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे.

**<u>६– आरोपीचे प्रतिकथन</u>**

प्रश्न १ पोलिसांनी केलेल्या तपास कामातील कागदपत्रांच्या प्रती तुम्हाला मिळाल्या काय ?

उत्तरः होय.

प्रश्न २ दोषारोपपत्रातील गुन्हयाचा तपशील जो आता तुम्हांस वाचून व स्पष्ट करुन सांगण्यात आला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तरः होय.

प्रश्न ३ सदरचा गुन्हा तुम्हाला कबूल आहे काय ?

उत्तरः मला गुन्हा मान्य व कबूल नाही.

(आरोपीची सही)

**समक्ष**

13.1.26

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले.**

**दिनांक : १३.०१.२०२६**
**ठिकाण : अकोले**

टिपण :- हा दोषारोपाचा तपशील आरोपी यांना वाचून व समजावून सांगितला.

13.1.26

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले.**

**दिनांक : १३.०१.२०२६**
**ठिकाण : अकोले**